आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १३८ वा ● शुक्रवार दि. २५ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## २८८ मतदारसंघासाठी राज्यातून आजपर्यंत ५५२ उमेदवारांचे ७२० नामनिर्देशन पत्र दाखल

मुंबई, : महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ मतदारसंघात निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र भरण्याचा आज तिसरा दिवस आहे. तिसऱ्या दिवशी म्हणजे २४ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यातून आजपर्यंत ५५२ उमेदवारांचे ७२० नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबर २०२४ पासून लागू झाली असून २२ ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. नामनिर्देशन पत्र भरणे सुरु असून २९ ऑक्टोबरला नामनिर्देशन पत्र भरण्याची शेवटची तारीख आहे. या अर्जाची ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येऊन ४ नोव्हेंबर २०२४ रोजी अर्ज मागे घेता येईल. मतदान २० नोव्हेंबरला होत असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

## मनोज जरांगे-पाटील 'किंगमेकर' ठरणार- हेमंत पाटील



मुंबई : राज्यातील ज्या मतदार संघांमध्ये मराठा उमेदवार निवडून येतील, तिथे उमेदवार देण्याचा निर्धार मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रणेते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.मराठा आंदोलकांच्या या भूमिकेमुळे नवीन सरकार निर्मितीत जरांगे 'किंगमेकर' ठरतील, अशी भावना इंडिया अगेन्स्ट करप्शनचे (आयएसी) राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी गुरूवारी (ता.२४) व्यक्त केली. विशेष म्हणजे जरांगे यांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या मतदार संघात मराठा आंदोलनाचे समर्थन करीत आरक्षणाच्या विचाराशी सहमत असलेल्या उमेदवारालाच निवडणूक रिंगणात उतरवून मताधिक्याने निवडून आणण्याचे आदेश दिले आहेत.

जरांगेंच्या या भूमिकेमुळे एससी आणि एसटी बांधवांसह ओबीसींमध्ये देखील 'जरांगे फॅक्टर' प्रभावी ठरला असल्याचे पाटील म्हणाले. निवडणुकीत 'जरांगे फॅक्टर' १०० टक्के चालणार, असा दावा पाटील यांनी केला. भाजप ला याचा मोठा फटका बसणार असून विदर्भातील ओबीसी मोठ्या प्रमाणात सत्ताधाऱ्यांविरोधात मतदान करतील.मराठा आणि ओबीसी बांधवांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, मात्र आता निवडणुकीत मतदार समाजभेद्यांचा 'करेक्ट कार्यक्रम' करणार, असा दावा देखील पाटील यांनी केला.

यंदा ची निवडणूक सर्वच अर्थाने वेगळी ठरणार आहे. मतदारांनी आपले मत हे कुणाला द्यायचे, हे अगोदरच ठरवून ठेवल्याने जरांगे यांच्या बाजूने बरेच मतं 'स्विंग ' होतील, असा दावा पाटील यांनी केला.जिल्हा आणि विभागनिहाय उमेदवारांची चाचपणी जरांगे करीत आहेत.येत्या दोन दिवसात योग्य उमेदवारांची घोषणा करीत ते त्यांच्या पुढच्या फळीसही निवडणुकीचा बिगुल फुंकतील,असे पाटील म्हणाले.

### एका जातीवर निवडणूक लढवता येणार नाही, मनोज जरांगेंचं मोठं वक्तव्य

मुंबई : मराठा आरक्षणाचा मुद्दा घेऊन म हाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांवर लक्ष ठेवून असणाऱ्या मनोज जरांगे यांनी एका जातीवर निवडणूक लढवता येणार नाही, असं वक्तव्य केलं आहे. विधानसभा निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या असताना एका जातीवर निवडणूक न लढवता सर्वांना सोबत घेऊन राजकीय सम ीकरण जुळवणार असल्याचे म्हणालेत. त्यामुळे ऐन विधानसभेच्या तोंडावर मनोज जरांगे कोणते राजकीय गणित जुळवतात याकडे साऱ्यांचाच लक्ष आहे. जालन्यातील अंतरवली सराटीमध्ये ते माध्यमांशी बोलत होते. दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत मराठा समाजाला डोळ्यासमोर ठेवूनच विधानसभेचे अर्ज भरावेत अशा सूचना केल्यानंतर एका जातीवर निवडणूक लढवता येणार नाही. सर्वांना सोबत घेऊन राजकीय समीकरण जुळवणार असं जरांगेंनी म्हणल्यानंतर राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. काही मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितल्यानंतर आता एकच उमेदवार दिल्यावाचून पर्याय नाही असंही मनोज जरांगे म्हणाले आहेत. प्रत्येकालाच उभं राहायचं आहे. त्यामुळे मी सर्वांना बोलून घेईन. ज्यांनी ऐकले नाही त्यांच्यावर मी नाराज होणार नाही. सर्वांनी ३०-४० दिवस कष्ट घेतले तर पाच वर्ष सर्व जनता आनंदी राहील असं जरांगे म्हणालेत. दरम्यान आज, जरांगे उमेदवार जाहीर करणार नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलंय.. ते म्हणाले, सर्वांना हात जोडून विनंती करणार एकच जण उभे रहा.. किती मतदारसंघ काढायचे हे आज जाहीर करायचे नाही. प्रत्येक मतदारसंघात चार ते पाच जणांनी फॉर्म भरून ठेवायचे आहेत. २९ किंवा ३० तारखेला मतदार संघ जाहीर करू. तेव्हाच उम ेदवार ही जाहीर करू. चिन्ह आल्याशिवाय उपयोग नाही असं मनोज जरांगे म्हणाले आहेत.




## परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर: महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) १० नोव्हेंबर २०२४ रोजी लातूर येथील ३१ परीक्षा केंद्रांवर घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. त्यामुळे परीक्षा केंद्रांवर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.




महाटेट परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने परीक्षेसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकारी, केंद्र प्रमुख यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिक शिक्षण अधिकारी वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, डायटच्या प्राचार्य भागीरथी गिरी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक परीक्षार्थीची व्यवस्थित तपासणी करूनच त्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश द्यावा. प्रतिबंधित केलेली कोणतीही वस्तू त्यांच्यासोबत परीक्षा केंद्रामध्ये घेवू जावू नये, यासाठी प्रवेशद्वारावरील अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाची करडी नजर राहणार असून असा प्रकार आढळून आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही. त्यामुळे सर्वांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीबद्दल योग्य माहिती घेवून ती जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

महाटेट परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण लवकरच आयोजित केले जाणार आहे. यावेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे. परीक्षा केंद्रावर प्रवेश करताना कोणकोणती ओळखपत्रे ग्राह्य धरण्यात येणार याबाबतची सुस्पष्टता करून घ्यावी, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी परीक्षा केंद्रावरील तपासणी, सुरक्षा आदीबाबत मार्गदर्शन केले. प्रारंभी शिक्षणाधिकारी श्रीमती वंदना फुटाणे यांनी परीक्षेच्या आयोजनाबाबत माहिती दिली. सकाळी १०.३० ते दुपारी १ या कालावधीत पेपर क्रमांक १ चे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी ८ हजार १५६ परीक्षार्थी असून २३ केंद्रांवर ही परीक्षा होईल. पेपर क्रमांक २ चे आयोजन दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या कालावधीत करण्यात आले असून ३१ केंद्रांवर होणाऱ्या या परीक्षेला ९ हजार ९९३ परीक्षार्थी उपस्थित राहतील. परीक्षा केंद्रावर प्रवेशासाठी प्रवेशपत्राशिवाय मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, वाहनचालक परवाना, पासपोर्ट, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, शाळा-महाविद्यालयाचे अद्ययावत ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे, असे शिक्षणाधिकारी श्रीमती फुटाणे यांनी सांगितले.

## बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ पूर्ण




मुंबई: विधानसभा निवडणुकीसाठी पुरेशा संख्येने ईव्हीएम मशिन्स उपलब्ध आहेत. सर्व बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ १८ ते २१ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत सर्व जिल्ह्यांकडून पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या निवडणुकीच्या अनुषंगाने १ लाख १८६ इतक्या मतदान केंद्रासाठी २ लाख २१ हजार ६०० बॅलेट युनिट (२२१ %) १ लाख २१ हजार ८८६ कंट्रोल युनिट (१२२%) व १ लाख ३२ हजार ९४ व्हीव्हीपॅट (१३२%) इतक्या प्रथमस्तरीय तपासणी मशिन्स उपलब्ध असून एकूण प्रथमस्तरीय करण्यात आलेल्या ईव्हीएम मशिन्स पैकी प्रशिक्षण व जनजागृतीच्या कार्यक्रमाकरिता त्यापैकी ५ हजार १६६ बॅलेट युनिट, ५ हजार १६६ कंट्रोल युनिट व ५ हजार १६५ व्हीव्हीपॅट इतक्या ईव्हीएम मशिन्सचा वापर करण्यात आला आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ दरम्यान मुंबई उच्च न्यायालय, व विविध खंडपीठासमोर १४ लोकसभा मतदारसंघात १६ निवडणूक याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदरहू १६ याचिकांमुळे राज्यातील विविध जिल्ह्यात ५६ हजार २०० बीयु व २८ हजार ४०८ सीयु मशीन्स न्यायालयीन प्रकरणामुळे सीलबंद होत्या. सद्यस्थितीत प्रस्तुत १६ निवडणूक याचिकांपैकी ७ निवडणूक याचिकांमधील ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशीन्स उच्च न्यायालयाने मुक्त केल्या आहेत. त्यामध्ये २३ हजार ७३१ बीयु व १२ हजार ३०७ सीयु मशीन्सचा समावेश आहे.

## एकजुटीने काम करा, आपली ताकद दाखवा - आमदार धिरज विलासराव देशमुख



लातूर/ प्रतिनिधी- लातूर ग्रामीण मतदारसंघामध्ये लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक, साखर कारखाना तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून आपण सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामे केलेली आहेत. आता आपण सर्वांनी मिळून एकजुटीने विधानसभेसाठी काम करायचे आहे. लोकसभा निवडणुकीत ज्या पद्धतीने तुम्ही काँग्रेसला सहकार्य केले. त्याच पद्धतीने विधानसभा निवडणुकीत सहकार्य करा, असे आवाहन करत ही निवडणूक महाराष्ट्राच्या भवितव्याची निवडणूक असल्याचे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले.

आमदार धिरज विलासराव देशमुख हे भिसे वाघोली, वाडी वाघोली, मसला, निळकंठ, भोसा, पिंपळगाव अंबा आंबा, कानडी बोरगाव, तांदूळजा,गाधवड आदी गावांच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी मतदारांशी घरगुती बैठकीमध्ये संवाद साधला. या गावभेटी दरम्यान त्यांचे जागोजागी मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

आगामी विधानसभेमध्ये महाविकास आघाडीचे सरकार निश्र्चित येणार आहे, असा विश्र्वास व्यक्त करत ते म्हणाले की, ही स्पर्धा आपण मागच्या विधानसभेत मला दिलेल्या मताधिक्याशी आहे. या निवडणुकीमध्ये मताधिक्याचा एक विक्रम आपण या ठिकाणी करावे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी भारत जोडो ही पदयात्रा काढून संविधान वाचवण्यासाठी प्रयत्न केले. देश, राज्य व सरकार हे संविधानाच्या माध्यमातून आणि कायद्याच्या चौकटीमध्ये चालले पाहिजे, असेही ते म्हणाले.

यावेळी लातूर ग्रामीणचे माजी आमदार वैजनाथराव शिंदे, मांजरा साखर कारखान्याचे माजी चेअरमन धनंजय देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर तालुका काँग्रेस पक्षाचे सुभाष घोडके, मांजरा साखर कारखान्याचे संचालक मदन भिसे, बंकट पाटील, दयानंद बिडवे, ॲड. भागवत पिसाळ, महेश अन्नदाते, अमोल भिसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

येणाऱ्या काळामध्ये समाजाचे सर्व प्रश्र्न सोडवण्यासाठी आम्ही बांधील आहोत. दि. २० नोव्हेंबरला सकारात्मक विचार करा व पुन्हा काँग्रेसच्या उमेदवाराला मतदान करा, असे आवाहन केले. मतभेद विसरुन कामाला लागा गावातील आपापसातील मतभेद या निवडणुकीत विसरा. ही निवडणूक महाराष्ट्राच्या भविष्याची निवडणूक आहे, असे सांगून गावामध्ये समन्वय, संवाद, एकजूट असेल तर सर्व प्रश्र्न सुटतात. आपण सर्वांच्या सहकार्याने भविष्यात काम करू असा विश्र्वास व्यक्त करत विकास कामाला दिशा देण्याचे काम ग्रामस्थांनी करावे त्यासाठी समन्वय असला पाहिजे, असेही ते म्हणाले.

## भाजपाच्या २६ उमेदवारांचे अर्ज दाखल



मुंबई : विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीच्या एकूण २६ उमेदवारांनी उमेदवारी दाखल करण्याच्या पाहिल्याच दिवशी गुरुपुष्यामृताचा मुहूर्त साधत वाजतगाजत गुरुवारी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. गुरुवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांमध्ये उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित आदींचा समावेश आहे. यावेळी या उमेदवारांसोबत उपस्थित राहून भाजपा आणि महायुतीच्या घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत मोठ्या प्रमाणावर शक्तीप्रदर्शन केले.

विलेपार्ले विधानसभा मतदारसंघातील भाजपा आणि महायुतीचे उमेदवार पराग अळवणी यांनी गुरुवारी विमानतळ कॉलनी येथील समाजकल्याण हॉल येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत आमदार प्रवीण दरेकर, उत्तर प्रदेशचे आमदार डॉ. रतन पाल सिंह, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मेहता आणि शिवसेनेचे उपविभाग प्रमुख सुभाष कांता सावंत उपस्थित होते. अंधेरी पश्र्चिम मतदारसंघातील भाजपा आणि महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार अमित साटम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत मुंबई भाजपाचे उपाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी, भाजपा जिल्हा सरचिटणीस विठ्ठल बांदेरी, शिवसेना विभाग प्रमुख अलताफ पेवेकर, संघटक पराग कदम, माजी नगरसेवक अनिश मकवाने, रोहन राठोड, सुधा सिंह आदि उपस्थित होते. मुलुंड मतदारसंघातील भाजपा आणि महायुतीचे आमदार मिहिर कोटेचा यांनी मुलुंड पूर्व येथील निवडणूक कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत मुलुंड विधानसभेचे प्रभारी आणि उत्तर प्रदेशातील भाजप आमदार शलभ मणी त्रिपाठी, माजी खासदार मनोज कोटक, किरीट सोमैय्या, माजी आमदार प्रकाश मेहता, शिवसेना विभागप्रमुख जगदीश शेट्टी आदी उपस्थित होते. कांदिवली पूर्व मतदारसंघातील भाजपा आणि महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार अतुल भातखळकर यांनी ठाकूर कॉम्प्लेक्स येथील निवडणूक कार्यालयात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत माजी खासदार गोपाळ शेट्टी उपस्थित होते.मलबार हिल मतदारसंघातील भाजपा आणि महायुतीचे उमेदवार मंगल प्रभात लोढा यांनी गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

कोथरूड येथून चंद्रकांतदादा पाटील, मुंबईत वडाळा मतदारसंघातून कालिदास कोळंबकर, शिंदखेडा मतदारसंघातून जयकुमार रावल, नंदुरबार मतदारसंघातून विजयकुमार गावित, धुळे मतदारसंघातून अनुप अगरवाल, शिरपूर मतदारसंघातून काशीराम पावरा, धामणगाव रेल्वे मतदारसंघातून प्रताप अडसड, हिंगणघाट मतदारसंघातून समीर कुणावार, गोंदिया मतदारसंघातून विनोद अग्रवाल, राळेगावमधून डॉ. अशोक उके, किनवटमधून भीमराव केराम, हिंगोलीतून तान्हाजी मुटकुळे, बदनापूर येथून नारायण कुचे, गंगापूर येथून प्रशांत बंब, शिर्डीतून राधाकृष्ण विखे पाटील, तुळजापूर येथून राणा जगजीतसिंह पाटील, सोलापूर दक्षिण येथून सुभाष देशमुख, कराड दक्षिण येथून अतुल भोसले, कोल्हापूर दक्षिण येथून अमल महाडिक आणि सुधीर दादा गाडगीळ यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. शहादा मतदारसंघातील भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आणि विद्यमान आमदार राजेश पाडवी यांनी अर्ज दाखल केला. त्यांच्यासोबत भाजपा प्रदेश सरचिटणीस विजयभाऊ चौधरी, जिल्हाध्यक्ष नीलेश माळी, युवा मोर्चा अध्यक्ष प्रशांत पाटील उपस्थित होते.

## जपानच्या वाणिज्यदूतांनी घेतली राज्यपालांची भेट



मुंबई : जपान व भारत हे एकमेकांचे स्वाभाविक भागीदार असून उभय देशांचे संबंध आज सर्वो च्च पातळीवर आहेत. जपानचे महाराष्ट्राशी संबंध विशेष चांगले असून जपान महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासोबत कौशल्य प्रशिक्षणासाठी सहकार्य करीत आहे, असे प्रतिपादन जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत यागी कोजी यांनी येथे केले.

यागी कोजी यांनी गुरुवारी (दि. २४) राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

जपानने राज्यातील अटल सेतू, बुलेट ट्रेन, मेट्रो लाईन यांसह अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांना अर्थसहाय्य केले आहे असे सांगून सध्या जपान ५०० किमी प्रतितास चालणाऱ्या लिनिअर मोटार कार रेल्वेवर काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील १४ उच्च शिक्षण संस्थांमध्ये जपानी भाषा शिकवली जात असल्याचे यागी कोजी यांनी यावेळी राज्यपालांना सांगितले.

आपण कॉयर बोर्डचे अध्यक्ष असताना टोकियो व ओसाका येथे भेट दिली होती. जपानमधील मशरूम आकाराने मोठे, चवदार व उत्कृष्ट दर्जाचे असून जपानने राज्यातील शेतकऱ्यांना तसेच महिला बचत गटांना मशरुम उत्पादनात मदत करावी अशी अपेक्षा **(पान ४ वर) ...**

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# टपाली मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज.

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. राज्यात एका टप्प्यात येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्याची निवडणूक यंत्रणा कार्यवाही करत आहे.

राष्ट्रीय कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचारी, सैन्यदलातील अधिकारी, दिव्यांग तसेच ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक यांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचारी, पोलीस, सैन्य दलातील अधिकारी कर्मचाऱ्यांना टपाली मतदानाची सोय देण्यात येते. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी २ लाख ६७ हजार २५० टपाली मतदान झाले होते. विधानसभा निवडणुकांसाठी नियुक्त अधिकारीकर्मचारी यांना टपाली मतदान करता यावे यासाठी निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे.

निवडणूक कामासाठी नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना टपाली मतपत्रिकेद्वारे (postal ballot Paper) मतदान करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्रपत्र '१२' किंवा '१२ अ' मध्ये अर्ज करणे आवश्यक आहे.तर संबधित निवडणूक अधिकारी यांच्याकडून पडताळणी करून मतदाराला टपाली मतपत्रिका देण्यात येते. प्रपत्र १२ मध्ये अर्ज केलेल्या निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त कर्मचाऱ्याने मतदानाकरिता उभारण्यात आलेल्या सुविधा केंद्रामध्ये मतदान करणे आवश्यक आहे.तर १२ 'ड' हा ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी उपलब्ध करून दिला जातो.

निवडणूक कामासाठी नेमलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांची व सुरक्षेसाठी तैनात अधिकारी यांची संपूर्ण माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून तयार करण्यात येते. निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशासोबत संबंधित कर्मचाऱ्यांची आगाऊरित्या माहिती भरलेले (जी- षग्त्) प्रपत्र -१२ व १२-'अ' संबंधित निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येतात.

पोस्टाद्वारे मतदानाचा हक्क बजाऊ इच्छिणाऱ्या मतदान कर्मचाऱ्यांनी प्रपत्र-१२ मध्ये आपला मतदान करण्यासाठी असलेला अर्ज संबंधित समन्वय अधिकाऱ्यामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे, मतदानाच्या तारखेच्या आधी किमान ०७ दिवसांपर्यत सादर करावा असा नियम आहे. निवडणूक कर्मचाऱ्यांच्या पहिल्या प्रशिक्षणाच्या वेळी कर्मचाऱ्यांनी संपूर्ण माहिती भरुन सही केलेले प्रपत्र-१२ जमा करुन घेण्यात येते. कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण ते उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यत प्रपत्र-१२ तसेच १२ 'अ' चे वितरण व संबंधित कर्मचाऱ्यांकडून भरण्यात आलेल्या प्रपत्रांची माहिती संकलित करण्यात येत असते.




कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेले प्रपत्र-१२ विधानसभा मतदारसंघनिहाय वेगवेगळे करणे व स्वतंत्र पाकिटांमध्ये त्या त्या मतदारसंघाचे नाव व जिल्ह्याचे नाव लिहून त्यामध्ये ठेवणे, प्राप्त झालेले 'प्रपत्र-१२' स्कॅन करुन त्या सोबतच्या प्रपत्र-४ मधील यादीसह त्या - त्या मतदारसंघांच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नेमलेल्या समन्वय अधिकारी यांच्याकडे पाठविले जातात.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार झाल्यानंतर पुढील ७ नोव्हेंबर २०२४ पर्यत विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी पडताळणी केलेल्या कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतपत्रिका, निवडणूक कर्तव्यार्थ प्रमाणपत्र व त्या सोबतचे आवश्यक प्रपत्र व लिफाफे तयार करणे व संबंधित कर्मचाऱ्यांबाबत मतदार यादीमध्ये (Marked cop) आवश्यक नोंद घेणे आवश्यक असेल.

जिल्हा समन्वय केंद्रास दिलेल्या पहिल्या भेटी वेळी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार झाल्यानंतर चौथ्या दिवशी दि.८ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा समन्वय केंद्रात (District Clearing Centre) अन्य जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाकरिताच्या टपाली मतपत्रिका जिल्हा समन्वय अधिकाऱ्याकडे देण्यात येईल. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार झाल्यानंतर पाचव्या दिवशी दि.९ नोव्हेंबर २०२४ सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा समन्वय अधिकारी यांनी राज्य स्तरावरील समन्वयन केंद्रामधील (डीरींश उश्रशरीळपस उशपीीश) एकत्र येऊन त्यांच्या जिल्ह्यातील विधानसभानिहाय टपाली मतपत्रिका तसेच त्या सोबतच्या आवश्यक प्रपत्र व लिफाफ्यांची देवाणघेवाण अन्य जिल्ह्यातील समन्वय अधिकाऱ्यांबरोबर केली जाते. पुन्हा त्यांच्या जिल्ह्याकडे पुरेशा सुरक्षा व्यवस्थेसह रवाना केली जाईल.

निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या दुसऱ्या प्रशिक्षणाच्या वेळी (दि. १० नोव्हेंबर २०२४ ते १४ नोव्हेंबर २०२४या कालावधीत) सर्व विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी हे कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण केंद्रावरील मतदान सुविधा केंद्रामध्ये (ऋरलळश्रळींरींळेप उशपीीश) संबंधित कर्मचाऱ्यांकडून टपाली मतपत्रिकांवर मतदान करुन घेण्यात येते. मतदान संपल्यानंतर सुविधा केंद्रामध्ये सर्व मतदारांनी (निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त कर्मचारी) मतदान केल्यानंतर सुविधा केंद्राच्या प्रमुखाने राजकीय पक्ष अथवा उमेदवार यांच्या उपस्थितीत मतपेट्यांमधील टपाली मतपत्रिका असलेले लिफाफे बाहेर काढून संबंधित विधानसभानिहाय त्याची विभागणी करून ते स्ट्रॉंगरुममध्ये ठेवतील.

त्यानंतर मतदानाच्या पाच दिवस आधी म्हणजे दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी जिल्हा समन्वय केंद्रात (District Clearing Centre) संबंधित जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांच्या समन्वय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत टपाली मतपत्रिका व उशीरा प्राप्त झालेल्या प्रपत्र-१२ असलेले स्वतंत्र लिफाफेबॅग हे त्या त्या जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय किंवा अन्य जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाकरिता मतदान करण्यात आलेल्या मतपत्रिकांचे लिफाफे संबंधित जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांकडे सुर्पूद करतील. त्यानंतर मतदानाच्या चार दिवस आधी १६ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्य समन्वय केंद्रात सर्व जिल्ह्यांचे जिल्हा समन्वय अधिकारी टपाली मतदान पत्रिका व उशीरा प्राप्त झालेल्या प्रपत्र-१२ यांचे आदानप्रदान करून व पुन्हा त्यांच्या जिल्ह्याकडे रवाना होतील.

मतदानाच्या तीन दिवस ते एक दिवस आधीपर्यतचा कालावधी ( १७ नोव्हेंबर २०२४ते १९ नोव्हेंबर २०२४) सर्व विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी यांच्या मार्फत मतदान कर्मचाऱ्यांचे तिसऱ्या प्रशिक्षणानंतर राज्य समन्वय केंद्राला दिलेल्या दुस-या भेटी वेळी त्या त्या दिवशी प्रशिक्षण केंद्रावरील मतदान सुविधा केंद्रामध्ये (Facilitation Centre) संबंधित कर्मचाऱ्यांकडून टपाली मतपत्रिकांवर मतदान करुन घेतली जाते व दुसऱ्या प्रशिक्षणानंतर मतदान केलेल्या टपाली मतपत्रिकांच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही पूर्ण होईल.

राज्य समन्वय केंद्राला दिलेल्या तिसऱ्या भेटीत मतदानाच्या दुसऱ्या दिवशी सर्व विधानसभा मतदारसंघाचे समन्वय अधिकारी व जिल्हा समन्वय अधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील विधानसभा समन्वय अधिकाऱ्यांकडून टपाली मतपत्रिका जमा करून घेतील व त्या राज्य समन्वय केंद्रामध्ये घेऊन जाणे व तेथे अन्य जिल्ह्यांच्या समन्वय अधिकाऱ्यांशी टपाली मतपत्रिकांचे लिफाफे व बॅग यांचे आदानप्रदान करण्याची कार्यवाही होते.

प्रत्येकाचे मत मोलाचे आहे राज्याची निवडणूक यंत्रणा हे जाणून कोणत्याही क्षेत्रातील मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी ही कार्यवाही करत आहे. तरी लोकशाहीच्या उत्सवातील आपल्या कर्तव्य व जबाबदाऱ्या निभावताना कामासोबत मतदान करण्याचीही जबाबदारी पार पाडण्यासाठी ज्यांना टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध आहे त्यांनी जरूर मतदान करावे.

## विद्यापीठ परीक्षेत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील कु. पूजा साहेबराव कांबळे प्रथम तर कु. सुमैया दस्तगीर शेख द्वितीय

लातूर : श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थ, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील कु. पूजा साहेबराव कांबळे हिने ८६.७१ टक्के गुण संपादन स्वा.रा.ती.म.वि. नांदेड विद्यापीठात सर्व प्रथम तर कु. सुमैया दस्तगीर शेख ८४.५३ टक्के गुण घेऊन सर्व द्वितीय येण्याचा बहूमान मिळविला आहे.



या दोन्हीही विद्यार्थिनी अतिशय गरीब व होतकरू कुटुंबातील असून त्यांनी उज्वल यश संपादन केले आहे.त्यांचा सत्कार श्री महात्मा शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी आणि संचालक बाबुराव तरगुडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, समन्व्यक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार सोनी, प्रा. काशीनाथ पवार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. दत्ता करंडे, प्रा. नागेश जाधव, प्रा. प्रकाश राठोड, नंदू काजापुरे आणि बालाजी डावकरे यांची उपस्थिती होती.

यावेळी यशस्वी विद्यार्थिनींनी महाविद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून समाजकार्य विभागामध्ये आम्हाला उत्कृष्ट अध्यापन मिळाले अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या.या सत्कार समारंभाला शुभेच्छा देताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, आज संपूर्ण विश्र्वाला व्यावसायिक समाजकार्याची नितांत आवश्यकता आहे. समाजात लोकशाही बळकट बळकटी करण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने समाजकार्यकर्त्याची निर्मिती समाजकार्य महाविद्यालयातून होत आहे. आज या गुणवंत विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आपल्या महाविद्यालयाचा प्रथम आणि द्वितीय येण्याचा बहुमान मिळवून नावलौकिक वाढविला आहे त्याबद्दल त्यांनी यशस्वी विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांचे व समाजकार्य विभागातील सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आशिष स्वामी यांनी केले, प्रास्ताविक डॉ. दिनेश मौने यांनी केले आणि आभार प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मानले.

## देशमुख यांनी प्रकाश नगर येथील नालंदा बौद्ध विहाराला दिली सदिच्छा भेट तर सायगाव येथील दरगाह येथे केली चादर अर्पण

लातूर (प्रतिनीधी) : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी लातूर शहरातील प्रकाश नगर येथील नालंदा बौद्ध विहाराला सदिच्छा भेट देऊन भगवान गौतम बुद्ध भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले, तसेच उपस्थितांसोबत बुद्ध वंदना केली. यानंतर दुपारी अंबाजोगाई तालुक्यातील सायगाव येथे जाऊन हजरत सय्यद सादिक अली शाह दरगाह येथे चादर अर्पण करून दर्शन घेतले. आदरणीय बाबा हजरत अख्तर अली शहा यांचे आशीर्वाद घेतले.



लातूर येथील नालंदा बौद्ध विहाराला सदिच्छा भेट यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, भन्ते पय्यानंद महाथेरो, भन्ते बोधिराज लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे सुरेश गायकवाड नालंदा बौद्ध विहार कमिटिचे अध्यक्ष उत्तम कांबळे, प्रज्ञा महिला मंडळाच्या अध्यक्षा शशिकला सुरवसे, सोनकांबळे,आपटे, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल विजय गायकवाड आयुब मणियार दत्ता सोमवंशी पप्पू देशमुख नागसेन कामेगावकर राजा माने यशपाल कांबळे योजना कामेगावकर सुनील कांबळे राजू गवळी गोटू यादव संजय ओहळ जेष्ठ पत्रकार अशोक देडे हरिभाऊ गायकवाड सुरवसे,प्रवीण सूर्यवंशी, कांबळे,धसवाडिकर प्रा. प्रवीण कांबळे, मकबूल वलांडीकर, राहुल डूमणे, भाऊसाहेब भडीकर, रत्नदीप अजनीकर, मोहन सुरवसे, इमरान सय्यद, सुमित खंडागळे, विजय टाकेकर, किरण बनसोडे आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी नागरिक उपस्थित होते



यानंतर दुपारी सायगाव येथे हजरत सय्यद सादिक अली शाह दरगाह येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी सय्यद अख्तर अली, शाह हुसैनी, दरबारे मुरशिदी, मोईज शेख, शकील इनामदार, ताजखान पठाण, रफिक पटेल, अरकात खान, परवेज हाश्मी, पाशाभाई गुत्तेदार, सय्यद नयूम, सय्यद असदुल्ला, मुक्तारखा पठाण, चांदपाशा इनामदार, फारुख शेख, युनूस मोमीन, अहमदखा पठाण, सत्तार शेख, इम्रान सय्यद, मकबूल वलांडीकर, तबरेज तांबोळी, हरिभाऊ गायकवाड, राम स्वामी कलीम शेख आदिसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## लातूर ग्रामीण मतदारसंघ हे आमच्यासाठी कुटुंब-श्रीमती वैशालीताई देशमुख

लातूर (प्रतिनीधी) :वकासरत्न विलासराव देशमुख हे लातूर शहर व लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाला आपले कुटुंब मानायचे. त्यामुळेच ते जे जे नवं ते लातूरला हवं, असे नेहमी म्हणायचे. त्यांच्या आदर्श विचारावरच आमची वाटचाल सुरु असून आमच्या सर्वांसाठी लातूर शहर व लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ कुटुंबच आहे. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघातील मतदारांनी आपल्या कुटुंबाचे सदस्य असलेले माजी मंत्री आमदार अमित देशमुख व आमदार धिरज देशमुख यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले.



विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. त्यानिमित्ताने विलास सहकारी साखर कारख्याच्या चेअरम श्रीमती वैशालीताई देशमुख यांनी दि. २४ ऑक्टोबर रोजी औसा तालूक्यातील टाका, बिरवली, शिवली, रिंगणी येथे संवाद मेळव्यात महिला मतदाराशी संवाद साधला. यावेळी सौ. दीपशीखा देशमुख, सुनितातार्इ अरळीकर, शितलताई फुटाणे, औसा महिला कॉग्रेसच्या अध्यक्ष सईताई गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या पाच वर्षांमध्ये लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख यांनी आमदार म्हणून काम करताना मतदारसंघात जास्तीत जास्त विकास योजना आणल्या व त्या योजना ग्रामीण भागातील नागरीकापर्यंत पोहोचविल्या आहेत, असे नमुद करुन श्रीमती वैशालीताई देशमुख म्हणाल्या, प्रत्येक गोर-गरीब, कष्टकरी, शेतकजयांसाठी विविध योजनेच्या माध्यमातून काम करण्याचा आमदार धिरज देशमुख यांनी प्रयत्न केला आहे. यापुढेदेखील ते लातूर ग्रामीण मतदारसंघात विकासाची कामे खेचून आणतील, असा विश्र्वास व्यक्त केला.

याप्रसंगी संध्याताई कदम, मिराताई शिंदे, लक्ष्मीताई बंडगर, प्रेमनंदा कदम, अश्रि्वनी भांगे, मेघा कदम, सविता शिंदे, संगीता सावंत, सुरेखा सावंत, अनुजा सावंत, मिरा सावंत, मिना सावंत, सुनिता शिंदे, सुनंदा पाटील, कार्तीकी कदम, शोभा कदम, सविता कदम, माणसी कदम, सुनिता गुजरे, मिराबाई कदम, जिजाबाई जाधव, शल्लुबी तांबोळी, नाजूकबी तांबोळी, सुनिता गरड, संगिता गरड, अंजीरबाई गरड, जयाबाई चौगुले, मिनाबाई पाटील, गवळण गुजारे, भागाबाई गुजारे, इंदाबाई गुजारे, संगिताताई साळुके, लिंबाबाई खडके, अचर्णाताई मेंठेकर, अपर्णा क्षीरसागर, गोदावरी क्षीरसागर आदी महिला, पुरुष, कॉग्रेस पक्षाचे कार्यकरते, गावकरी उपस्थित होते.

## निवडणूक खर्चावर नियंत्रणासाठी दक्ष रहावे; कुठल्याही कारवाईत फलनिष्पत्ती अपेक्षित - निवडणूक खर्च निरीक्षक गौतम कुमार

नंदुरबार(जिमाका) : निष्पक्ष आणि निकोप वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील विविध यंत्रणांच्या समन्वयातून निवडणूक खर्चावर देखरेखीचे व सनियंत्रणाचे काम केले जाते. हे काम करत असताना सर्वांनी सतर्कतेने व दक्षतेने काम करणे गरजेचे आहे. तसेच विविध ठिकाणी तपासणी व कारवाई करताना फलनिष्पत्तीवर भर द्यावा, अशा सूचना विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यासाठी नियुक्त खर्च निरिक्षक गौतम कुमार यांनी केल्या आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना श्री. गौतम कुमार बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रमोद भामरे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक स्नेहा सराफ, खर्च विषयक नोडल अधिकारी प्रविण देवरे, निवडणूक निर्णय अधिकारी सर्वश्री अनय नावंदर (अक्कलकुवा), सुभाष दळवी (शहादा), श्रीमती अंजली शर्मा (नंदुरबार), महेश चौधरी (नवापूर), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प अधिकारी राहुल गावडे, उपवनसरंक्षक संतोष सस्ते, जिल्हा अग्रणी बँकचे व्यवस्थापक सचिन गांगुर्डे, रेल्वे स्थानकचे अधिक्षक संजीव रंजन यांच्यासह जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघातील खर्च विषयक कामकाजावर देखरेख करणारे नोडल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना गौतम कुमार म्हणाले, प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील आंतरजिल्हा सिमांवर अत्यंत सतर्कतेने यंत्रणांनी काम करणे गरजेचे आहे. विशेषतः प्रचार सभा, मिरवणुका व कार्यक्रमांवर केल्या जाणाऱ्या खर्चावर निगराणी साठी असलेल्या पथकांनी अत्यंत बारकाईने नोंदी घेताना व्हिडिओ शुटींग करावी. तसेच आंतरराज्य सिमांवर तैनात सनियंत्रण पथकांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. कुठल्याही पथकाच्या माध्यमातून अथवा कुठल्याही चेकपोस्टवर कारवाई करताना अथवा तपासणी तसेच कारवाई करताना निवडणूक आयोगाच्या अपेक्षेप्रमाणे फलनिष्पत्तीवर भर देण्यात यावा. निवडणूकीच्या निमित्ताने होणाऱ्या प्रत्येक अर्थविषयक बाबींवर अत्यंत सुक्ष्मपणे लक्ष पुरविण्याची गरज असल्याचे सांगून ते म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार वाहनांची तपासणी अधिक दक्षतापूर्वक करावी. पथकांनी त्यांना नेमून देण्यात आलेल्या जबाबदारीप्रमाणे प्रभावीपणे काम करावे. भरारी पथकाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक गोष्टींची नोंद ठेवून सहाय्यक खर्च निरीक्षकांच्या संपर्कात राहावे. मतदारांना प्रभावित करण्यासाठीच्या रोकड, मद्य तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस प्रतिबंध करावा. कारवाईमध्ये सातत्य ठेवावे. रेल्वे व परिवहन विभागाने परराज्यातून व शेजारील जिल्ह्यामधून होणाऱ्या प्रवासी हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे.

यावेळी श्री. गौतम यांनी प्रत्येक विधानसभा मतदार संघनिहाय सुरू असलेले. निवडणूक कामकाजाची माहिती घेतली. त्या अनुषंगाने विधानसभा मतदार संघनिहाय सर्वश्री अनय नावंदर (अक्कलकुवा), सुभाष दळवी (शहादा), श्रीमती अंजली शर्मा (नंदुरबार), महेश चौधरी (नवापूर) यांनी सादरीकरण केले.

यावेळी झालेल्या चर्चेत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रवण दत्त,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रमोद भामरे, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षक स्नेहा सराफ, खर्च विषयक नोडल अधिकारी प्रविण देवरे यांनी सहभाग घेतला. यावेळी पोलीस अधिक्षक, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लिड बॅंक मॅनेजर, आयकर अधिकारी, उप आयुक्त, राज्य वस्तू व सेवा कर, जिल्हा वन अधिकारी या विभागामार्फत निवडणूक खर्च देखरेखीवर केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.

## सत्संगला येणाऱ्या अल्पवयीन मुली गरोदर राहिल्याने खळबळ! समोर आले धक्कादायक सत्य; सेवादार प्रसादातून...

बुलंदशहर : महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये सातत्यानं वाढ होत असून, उत्तर प्रदेशातून अशीच मन सुन्न करणारी बातमी समोर आली आहे. बुलंदशहर येथील स्याना पोलीस स्थानकाच्या हद्दीत येणाऱ्या राधास्वामी सत्संग व्यास परिसरात खेळण्यासाठी म्हणून येणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचं धक्कादायक वृत्त समोर आलं आहे. सत्संगमध्ये असणाऱ्या ६५ वर्षीय सेवादारावर या मुलींवर मागील ८ महिन्यांपासून प्रसादातून नशेच्या गोड गोळ्या देण्याच्या बहाण्यानं अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला. दोन मुलींपैकी एकीच्या घरी ती चार वर्षाची गरोदर असल्याचा खुलासा होताच घरातील मंडळींच्या पायाखालची जमीन सरकली. ज्यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या. घटनाक्रम मन विषण्ण करणारा बुलंदशहर जनपद येथील स्याना पोलीस स्थानकाच्या हद्दीत येणाऱ्या एका खेडेगावातील दोन १४ वर्षीय मुली, (साधारण ६ वी आणि ७ वीच्या विद्यार्थिनी) या दोघीही दोन वेगवेगळ्या कुटुंबातील. या मुली दररोज गावापाशी असणाऱ्या राधास्वामी सत्संग व्यास येथील परिसरात खेळण्यासाठी जात होत्या. तिथंच काम करणाऱ्या एका सेवादारानं त्या दोघींना नशेच्या गोड चवीच्या गोळ्या देत याचंच आमिष त्या मुलींना दाखवून त्यांच्यावर बलात्कार केला. जवळपास ८ महिने सेवादारानं हे दुष्कृत्य सुरूच ठेवलं होतं. प्रकरण त्या क्षणी प्रकाशात आलं जेव्हा इयत्ता सातवीत शिकणाऱ्या मुलीच्या पोटात वेदना सुरू झाल्या. नातेवाईकांनी तिला डॉक्टरांकडे नेलं असता तिथंच ती चार महिन्यांची गरोदर असल्याची खळबळजनक बाब समोर आली. ज्यावेळी कुटुंबीयांनी त्या मुलीला या प्रकरणाची सविस्तर माहिती विचारली तेव्हा तिनं घडला प्रकार सर्वांपुढं आणला. आपल्यासोबत आणखी एक मुलगी असल्याचंही त्या मुलीनं सांगितलं. ज्यानंतर दुसऱ्या अल्पवयीन मुलीचीही चौकशी करण्यात आली. तिच्याकडूनही अशीच माहिती मिळाली असता तातडीनं पोलीस तक्रार दाखल करत आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या आणि दोन्ही मुलींना वैद्यकिय चाचणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आलं. सध्या याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत असून, आणखी कोणाचा यात सहभाग आहे का, याची उकल करण्यास सुरुवात केली आहे.

**रोखे घ्या ..**

विवाद विषय गाजे
निवडणूकीचे रोखे
सगळे होई शिकार
बंदूक सर्वावर रोखे
कसे अडकवू कुणां
विचीत्रचालले डोके
हवालदार चूप कसे
दिवसा मारले डाके
नियम अटी मार्गाने
कसे जमवले खोके
तोंडावर पडले तरी
सरळ राहिली नाके
आकडे मोठे पाहून
चुके काळजा ठोके
जमवी देणग्या सारे
एक दुस-यांना ठोके
रूळावरूननियमात
धडा धडा पळे चाके
सिग्नल दिसले नाही
इथेचं ड्रायव्हर चुके
लक्षअसे आयोगाचे
कोण कधी तो चुके
कायद्याच्या चौकटी
बलाढ्य उंचही झुके

**खोके..**

कितीकरालं चर्चा
कुणा किती खोके
पुन्हा पुन्हा उगाचं
वरती काढते डोके
कोण उगा कशास
अस्मिता ती विके
चार दमड्यासाठी
लागले नाही भिके
कुणी दडले रहस्य
भडा भडाड ओके
गैरसमज हो जरा
बाकी सगळे ओके
काय असेल झाले
खुपसती सर्व नाके
पडेल गुपीत बाहेर
चुके काळजा ठोके
उघड करणारं सारे
उगाचबोंबाट ठोके
बातमी हवी गरम
कोण देतोय झोके
डोळे बंदिस्त सारे
कानाचे खुली भोके
सत्ता अपेक्षे पुढती
अस्मिता कशी झुके

**हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

## विधानसभा निवडणुकीत छोट्या घटक पक्षांचे महत्त्व वाढले; अनेक ठिकाणी रंगणार बहुरंगी लढती?

मुंबई : राज्यात १५ व्या विधानसभा निवडणुकीसाठी रणशिंग फुंकले गेले असून, २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन राज्यातील जनता कोणाच्या बाजूने कौल देते ते स्पष्ट होणार आहे. महायुती आणि महाविकास यांच्यातील सहा पक्ष राज्यात प्रमुख भूमिकेत असले तरीसुद्धा सध्याची राजकीय परिस्थिती पाहता छोट्या घटक पक्षांनाही फार महत्त्व आलंय. मागील लोकसभा निवडणुकीत महायुती किंवा महाविकास आघाडी यांच्यासोबत गेलेले हे पक्ष यंदा स्वत:च्या जोरावर विधानसभेच्या आखाड्यात आपली ताकद आजमावणार असल्याने राज्यात अनेक ठिकाणी बहुरंगी लढती होऊन धक्कादायक निकालाची शक्यता वर्तवली जात आहे.

घटक पक्षांना सुगीचे दिवस: महायुती असो अथवा महाविकास आघाडी त्यांच्यासोबत असलेल्या घटक पक्षांना जागा देण्याच्या मुद्द्यावरून जागा वाटपाचं घोडं अद्याप अडलेलं आहे. याबाबत दोन्ही बाजूंनी बैठकांचं सत्र वारंवार सुरू असून, छोट्या घटक पक्षांचा दबावही मोठ्या प्रमाणात दिसून येतोय. प्रहार संघटनेचे बच्चू कडू, स्वाभिमानी संघटनेचे राजू शेट्टी आणि संभाजी राजे यांनी महायुतीविरोधात तिसऱ्या आघाडीच्या रूपाने आवाज उठवलाय. जयंत पाटील यांची शेकाप, समाजवादी पार्टी, डावे पक्ष हेसुद्धा महायुतीच्या विरोधात मैदानात आहेत. तर सदाभाऊ खोत यांची रयत क्रांती, विनय कोरे यांचा जनसुराज्य, रामदास आठवले यांची रिपाइं हे पक्ष महायुतीच्या बाजूने आहेत. अशात हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने नेहमीच निर्णय प्रसंगी हितसंबंध जपत त्या त्या आघाडीला पाठिंबा दिलाय. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीचा प्रभाव लोकसभा निवडणुकीत दिसला नसला तरी विधानसभेत वंचित बहुजन आघाडी मोठ्या प्रमाणात मते घेणार आणि याचा फटका दोन्ही आघाड्यांना बसण्याची जास्त शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत महायुती सोबत गेलेल्या महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाने यंदा जागावाटपात भाजपासोबत चर्चा फिस्कटल्याने स्वत:ची स्वतंत्र चूल मांडलीय.

# दुर्लक्ष करू नका! लठ्ठपणा ठरू शकते 'या' आठ आजाराचे कारण

काही आजार असे असतात की, ज्यांच्यामुळे आपल्याला फार त्रास होत नाही. परंतु त्या आजारामुळे इतर आजारांना, व्याधींना आमंत्रण मिळते. लठ्ठपणादेखील अशाच एका आजारापैकी आहे. लठ्ठपणामुळे उठणे-बसणे, चालणे यामध्ये त्रास होतो. मात्र, कोलेस्ट्रोलपासून मधुमेह, हृदयविकारासारखे आजार जडले जातात. लठ्ठपणामुळे आठ जीवघेणे आजार होऊ शकतात.



१. ऑस्टियोआर्थराइटिस: लठ्ठपणामुळे वाढलेल्या अतिरिक्त वजनाचा गुडघ्यांवर खूप वाईट परिणाम होतो. अर्थात लठ्ठपणामुळे शरीराच्या इतर भागावरही परिणाम होतो. परंतु काही लोकांसाठी, लठ्ठपणामुळे वाढलेले वजन गुडघ्याच्या सांध्यामध्ये असलेल्या कार्टिलेजचे नुकसान करते. हा त्रास वाढून पुढे ऑस्टियोआर्थरायटिसचे रूप घेते.

२. स्ट्रोक आणि हृदयविकार: ज्या लोकांचे वजन खूप वाढते, त्यांच्या शरीरात कोलेस्ट्रॉलचे अधिक प्रमाण आणि उच्च मधुमेहाची समस्या असते, या दोन्हींमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

३. मधुमेह प्रकार -२: मधुमेह प्रकार -२ हा लठ्ठपणाशी संबंधित सर्वात सामान्य आजारांमध्ये समाविष्ट आहे. हा आजार आपल्या जीवनशैलीशी निगडीत आजार आहे.

४. कर्करोगाचा धोका: लठ्ठपणामुळे कर्करोगाचा धोका वाढतो. काही प्रकारचे कर्करोग हे लठ्ठपणाच्या आजारांमुळे होतात. यामध्ये कोलन कॅन्सर, किडनी कॅन्सर, ब्रेस्ट कॅन्सर आदी आजार होण्याची शक्यता आहे.

५. पित्ताशयाचे आजार: तंदुरुस्त लोकांपेक्षा लठ्ठ लोकांमध्ये पित्ताशयाशी संबंधित आजार जास्त प्रमाणात आढळतात. विशेषत: अशा लोकांमध्ये ज्यांचे वजन खूप लवकर वाढते किंवा खूप लवकर वजन कमी होते. म्हणून, वजन कमी करताना, पित्त मूत्राशयाच्या स्टोनची समस्या टाळण्यासाठी, दर आठवड्याला तुमचे वजन एक पौंड कमी होईल याची खात्री करा.

६. झोपेच्या संबंधित आजार: लठ्ठपणामुळे तुम्हाला जास्त झोप किंवा कमी झोप या दोनपैकी कोणतीही समस्या असू शकते. जास्त चरबीमुळे श्वसनमार्गाचा वरचा भाग आकुंचन पावतो, त्यामुळे शरीरात ऑक्सिजनची कमतरता होते आणि रक्तपुरवठा मंदावतो, त्यामुळे जास्त झोप लागते.

७. दमा: अमेरिकन लंग असोसिएशनच्या मते, पोट आणि छातीवर जास्त प्रमाणात चरबी जमा झाल्यामुळे फुफ्फुसे संकुचित होतात आणि श्वास घेण्यास त्रास होतो. त्यामुळे दम्याची समस्या निर्माण होते.

८. युरिक ॲसिडची समस्या: रक्तातील यूरिक ॲसिड वाढण्याच्या समस्येला गाउट (उदलू) म्हणतात. रक्तातील युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यामुळे सांधे दुखू लागतात.

# महायुती सरकारने कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडवला - माजी मंत्री आमदार अमित देशमुख







लातूर (प्रतिनीधी) : गेल्या पाच वर्षात आर्वी गावात ३० कोटी पेक्षा अधिक विकास केली आहेत. या निवडणुकीतील काँग्रेसचा लातूर शहर विधानसभेचा जाहीरनामा हा लोकाभिमुख असेल, काँग्रेसने देशात पहिल्यांदा लातूरमध्ये महिलांना सिटी बस प्रवास मोफत केला असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले.

गुरुवार दि. २४ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी लातूर शहर मतदारसंघातील लातूर शहरानजीकच्या आर्वी येथे पदयात्रा केली, स्थानिक महिलांनी औक्षण करून फुलांची पुष्पवृष्टी करून माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे स्वागत केले यावेळी ते बोलत होते. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहर मतदार संघातील केलेल्या विकास कामांच माहितीपत्रक या पदयात्रेत भाजीपाला विक्रेते किराणा दुकानदार महिला ज्येष्ठ नागरिक यांना दिले.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, ट्वेंटीवन शुगरचे व्हॉइस चेअरमन विजय देशमुख, आर्वीचे निरीक्षक अनिल पाटील, आर्वीचे सरपंच पप्पू देशमुख, बापू चव्हाण, विलास भोसले, धनंजय गाडगीळ, ज्ञानेश्र्वर चौधरी, सचिन बंडापले, चांदपाशा इनामदार, बाबा पठाण, सुलेखा कारेपूरकर, अशोक चव्हाण, राम स्वामी, विजय टाकेकर, राज क्षीरसागर, गणेश नवशिंदे, प्रल्हाद रणखांब, दयानंद जाधव, आदीसह काँग्रेस महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते स्थानिक नागरीक उपस्थित होते

आर्वी येथील भक्तिनगर येथून पदयात्रेला सुरुवात झाली त्यानंतर माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी भक्ती हनुमान मंदिर व श्री साई गणेश हनुमान मंदिर येथे जाऊन दर्शन घेतले त्यानंतर पदयात्रा साई रोड तिरुपती नगर पठाण नगर तर समारोप अहिल्यादेवी होळकर नगर येथे झाला.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली भक्ती नगर वसाहत विकसित झाली. लातूरचा विस्तार चारही दिशांनी झाला लातूरची उत्तरोत्तर प्रगती होत आहे, त्याचे लक्षण ही उत्तरेकडील वसाहत आहे. लातूर शहर मतदार संघात आम्ही कोट्यावधीचा निधी खेचून आणला. आर्वी ग्रामपंचायत हादिमध्ये ३० कोटीचा निधीही आम्ही दिल्ली मुंबई वरून खेचून आणला आर्वी ग्रामपंचायत मध्ये नागरीकरण झपाट्याने झाले आहे. आर्वीच्या विकासाची भूख अधिक आहे यासाठी आणखी आम्ही काम करू असे त्यांनी सांगितले.

**महायुती सरकारने कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडवला**

पुढे बोलताना ते म्हणाले की महाराष्ट्रात महायुती सरकारने कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडवला आहे, महागाई बेरोजगारी भ्रष्टाचार या राज्यात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काँग्रेसचा लातूर शहर विधानसभेचा जाहीरनामा हा लोकाभिमुख असेल काँग्रेसने देशात पहिल्यांदा लातूरमध्ये महिलांना सिटी बस प्रवास मोफत केला असे ते म्हणाले.

लातूर लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी लातुर शहर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ जनसंपर्क अभियान सुरु केले असून गुरुवार दि. २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पांखरसांगवी येथे पदयात्रा काढून नागरीकांशी संवाद साधला, या ठिकाणी नागरीकांचा ऊस्फुर्त प्रतिसाद मिळाला. पदयात्रे दरम्यान ठिकठिकाणी ग्रामस्थानी औक्षण करुन स्वागत केले.

**जनसंपर्क अभियान पदयात्रा - वैशालीताई. देशमुख**

क़ासारगाव येथील ग्रामस्थांशी साधला संवाद

जनसंपर्क अभियान अंतर्गत अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ कासारगाव येथे पदयात्रेच्या माध्यमातून चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. या पदयात्रेत आणि संवाद बैठकीस गोपाळ बडे, जयदेव मोहिते, नंदकिशोर मोहिते, जजकुमार मोहिते, महादेव बुटके, जीवनाराव मोहिते, विनोद दिवे, सुनिल मोहिते, सूर्यकांत मोहिते, लक्ष्मण सपाटे, वामन मोहिते, बाबासाहेब मोहिते, विठ्ठल भगाडे, संभाजी कांबळे, संचिता रत्नगोले, रंजना मोहिते, महानंदा मोहिते, छायाबाई मोहिते, मुद्रिकाबाई सपाटे, राधाबाई केळे, मंगल जाधव, शेषाबाई भोसले, सुमनबाई मोहिते, रोहिणी तोडकर, कौशाबाई मस्के, अनुसया कांबळे, बालिका बडे, पुष्पा मोहिते, शकुंतला भगाडे, कलावती कदम आदी उपस्थित होत्या.

टवेन्टिवन शुगर्स ली. च्या संचालीका अदिती अमित देशमुख यांनी लातुर शहर विधानसभा मतदारसंघात काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ जनसंपर्क अभियान अंतर्गत गुरुवार दि. २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी वासनगाव येथे पदयात्रा काढून नागरीकांशी संवाद साधला, या पदयात्रेस नागरीकांचा ऊस्फुर्त प्रतिसाद मिळाला. पदयात्रे दरम्यान ठिकठिकाणी ग्रामस्थानी औक्षण करुन स्वागत केले.

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सी व्हिजिल पवर तक्रार करा

मुंबई, : भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटीझन प विकसित केले आहे. या पवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.




आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल प विकसित केले आहे. या मोबाईल पद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल पवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

सी व्हिजिल प अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त प उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. प वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

वैशिष्ट्ये

सी व्हिजिल प हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

वापर कसा करायचा

एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील प स्टोर या पमध्ये जावून सी व्हिजिल (cVIGIL) सर्च करावे.त्यानंतर प डाऊनलोड करा. त्यानंतर प उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.

अचूक कृती व देखरेख

या प्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सी व्हिजिल प जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

लाईव्ह फोटो, व्हिडिओ

या पच्या अचूकतेसाठी पमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हीडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.

तातडीने होते कारवाई

या पवर तक्रार दाखल होताच स्थानिक निवडणूक यंत्रणा तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करेल.

डाटा सुरक्षा

या पवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

# राशीभविष्य २५ ऑक्टोबर २०२४

मेष : शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम
वरिष्ठांच्या गाठीभेटीतून महत्त्वाचा निर्णय घेऊ शकाल. आपल्या विचारांना योग्य दिशा मिळेल.
वृषभ : शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व
एखाद्या सामाजिक चळवळीचे नेतृत्व हाती येईल. भाव-भावनांचा व खाण्या-पिण्याचा कोणताही अतिरेक टाळा.
मिथुन : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण
आर्थिक प्रकरणातून अजूनही यशस्वी वाटचाल राहील. नोकरीव्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला जाईल.
कर्क : शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पूर्व
विचारवंताशी पडणाऱ्या गाठीभेटीतून काही शिकायला मिळेल. अर्थविश्व समाधानकारक राहील.
सिंह : शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व
नोकरदारांनी हवी तेथे बदली करून घेण्यासाठी प्रयत्नशील रहा. प्रेमिकांनी थोडे सबुरीने वागलेले बरे.
कन्या : शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : दक्षिण
नोकरीव्यवसायातील जबाबदारी स्वत:हून स्वीकारायची घाई करू नका. सल्लामसलत उपयोगी ठरेल.
तुळ : शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम
वैवाहिक जीवनातील भावनांची कदर करा. फार मोठ्या महत्त्वाकांक्षा काही दिवस बाजूला ठेवणे हितकारक.
वृश्चिक : शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पश्चिम
कौटुंबिक प्रश्नांना सहज मार्ग सापडतील. एकंदरीत अनेक क्षेत्रातील दडपण कमी होत राहील.
धनु : शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पश्चिम
एखादी मोठी गुंतवणूक करताना पुरेशी सल्लामसलत झाल्याची खात्री करा. न पेलणारी आश्वासने देऊ नका.
मकर : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
स्वत:ची तब्येत आणि पथ्यपाणी सांभाळून वेळापत्रक अचूकपणे साधण्याचा प्रयत्न करा.
कुंभ : शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण
व्यापारीवर्गाला संघटनेद्वारे आपला एखादा प्रश्न सोडवून घेता येईल. युवकांनी वाढणारी कार्यशक्ती योग्य कारणी लावा.
मीन: शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व
आर्थिक वसुली आणि मोठे व्यवहार करताना आपल्या क्षेत्रातील बुजुर्गाची मदत घेणे हितावह ठरेल.

# इतिहासात आजचा दिवस २५ ऑक्टोबर

अंतरराष्ट्रीय
१८५४ - 'चार्ज ऑफ लाईट ब्रिगेड' या नावाने गाजलेल्या बालक्लाव्हाच्या लढाईत ब्रिटिश सैन्याचे शिरकाण झाले.
१९४२ - शाही हवाई दलाने उत्तर इटलीतील मिलान, जिनोआ आणि टुरीन या शहरांवर चोवीस तास सतत बॉम्बहल्ले केले.
१९६० - पहिले इलेक्ट्रॉनिक मनगटी घड्याळ तयार झाले. याला ' ॲक्युट्रॉन' असे नाव होते.
२००४ - नियंत्रणरेषेजवळील काही प्रदेशांना स्वायत्तता देण्याची मुशर्रफ यांची सूचना.
२००८ - लंडनमध्ये आयोजित केलेल्या एका समारंभात अनिवासी भारतीय रणजित सिंग बक्षी यांना 'एशियन ऑफ दि इयर' सन्मानाने गौरविण्यात आले.

राष्ट्रीय
१२९६ - संत ज्ञानेश्वर यांनी समाधी घेतली.
१८९० - हरी नारायण आपटे यांच्या 'करमणूक' साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
२००२ - भारताच्या पंकज अडवाणींने जागतिक स्नूकरचे अजिंक्यपद मिळवले.
२००७ - तामिळनाडुत कोईम्बतूर बॉम्बस्फोटाची सुनावणी करणाऱ्या विशेष न्यायालयाने आणखी २० दोषींना शिक्षा ठोठावली.
२००७ - मराठवाडा एकात्मिक विकास कार्यक्रमांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध योजनांसाठी ११४ कोटी ८ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यास मान्या देण्यात आली.
२००७ - मराठवाडा विकास कार्यक्रमातर्गत औरंगाबाद, अंबाजोगई, नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद यांना सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ६४ कोटी ७० लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली.
२००८ - रशियातील कझान येथे आयोजित केलेल्या 'गोल्डन मिनबार' या मुस्लिम चित्रपटांसाठी असलेल्या महोत्सवात हा सन्मान 'जोधा अकबर' ने मिळविला. तर उत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार हृतिक रोशनला मिळाला.

जन्म
१८२५ - योहानेस स्ट्रॉस, संगीतकार.
१८८१ - पाब्लो पिकासो, स्पॅनिश चित्रकार.
१८८८ - रिचर्ड एव्हलीन बेअर्ड, पृथ्वीच्या दोन्हीही भौगोलिक धृवांवरून सर्वप्रथम विमानोड्डाण करणारा.
१९२९ - पीटर लोडर, इंग्लीश द्रुतगती गोलंदाज.

निधन
१४०० - जॉफ्रे चॉसर, 'कँटबरी टेल्स' लिहिणाऱ्या कादंबरीकार.
१९८० - साहिर लुधियानवी, हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार.

# जपानच्या वाणिज्यदूतांनी..

**(पान १ वरुन) :** राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केली. या संदर्भात उभय देशातील कृषी विद्यापीठांमध्ये सहकार्य स्थापित व्हावे असे त्यांनी सांगितले.

जपानमधील प्रसिद्ध 'मियाझाकी' आंबा अतिशय चवदार असून त्याला जगभरात सर्वाधिक बाजारमूल्य मिळते असे सांगून या आंब्याची लागवड महाराष्ट्रात करण्यासाठी देखील जपानने राज्याला मदत करावी जेणेकरून त्याचा लाभ राज्यातील शेतकरी बांधवांना होईल असे राज्यपालांनी सांगितले.

पायाभूत सुविधांप्रमाणे जपानने कृषी क्षेत्रात राज्याला मदत केल्यास त्याचा राज्यातील व विशेषतः आदिवासी भागातील शेतकऱ्यांना लाभ होईल असे राज्यपालांनी सांगितले.

विद्यापीठांचा कुलपती या नात्याने आपण राज्यातील विद्यापीठांमधून जपानी भाषेच्या अध्यापनाला चालना देऊ व त्या दृष्टीने जपान फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची व राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक राजभवन येथे आयोजित करू असे राज्यपालांनी यागी कोजी यांना सांगितले.

जर्मनीप्रमाणे जपानने देखील महाराष्ट्रासोबत कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी योजना राबवावी तसेच सौर ऊर्जा निर्मितीसाठी मदत करावी अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894